सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २२७ | रविवार, दि. १० मे २०२६ | पाने : ४

अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. अनिल बडगुजर**
डीवाय.एस.पी.



**सौ. जयश्रीताई वाडेकर**
लिपीक



**श्री. रोहित बोढरे**
आर्टीस्ट




**श्री. भुषण भामरे**
ज्वेलर्स

# मराठी भाषेची पीछेहाट: ८० हजार विद्यार्थी मातृभाषेतच अनुत्तीर्ण!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. एकूण ३५ विषयांपैकी १२ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. १०० टक्के निकाल लागणाऱ्या शाळांची संख्याही वाढताना दिसत आहे. एकीकडे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांच्या गुणांची टक्केवारी वाढत आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर प्रथम भाषा म्हणून मराठी भाषेची निवड करून परीक्षा देणाऱ्या राज्यातील सुमारे १० लाख ८७ हजार ६९९ विद्यार्थ्यांपैकी ८० हजार ८०३ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याचे धक्कादायक चित्र आहे.इयत्ता दहावीत द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून मराठी भाषेची निवड करून एकूण ४ लाख १३ हजार ९१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, त्यापैकी १३ हजार ७४१ विद्यार्थी नापास झाले आहेत. ज्या राज्याची राजभाषा मराठी आहे, ज्या भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे, अशा मराठी भाषेतच राज्यातील सुमारे ९४ हजार ५४४ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले




आहेत. एकीकडे परकीय भाषा निवडणाऱ्या विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण चांगले असताना मराठी विषयाची अनास्था या निमित्ताने उघड झाली आहे.दहावीच्या परीक्षेत द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून गुजराती भाषेची निवड करणाऱ्या ३०२ विद्यार्थ्यांपैकी सर्व म्हणजे १०० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. संस्कृत ही द्वितीय आणि तृतीय भाषा निवडणाऱ्या ९६ हजार ३३१ विद्यार्थ्यांपैकी ९५ हजार ५७१ म्हणजे ९९.२१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अरेबिक भाषा विषयाचा निकाल ९९.५९ टक्के लागला आहे.प्रथम भाषा म्हणून मराठी भाषा विषयाचा निकाल ९२.५७ टक्के लागला आहे. जवळपास आठ टक्के विद्यार्थी नापास झाले आहेत. मराठी हीच मातृभाषा असलेले विद्यार्थी हे मराठी विषयात अनुत्तीर्ण होत आहेत. याचा अर्थ भाषिक कौशल्य या विद्यार्थ्यांना प्राप्त असण्याची शक्यता नाही. त्यामुळे मराठी विषयाच्या अध्यापन प्रक्रियेचा विचार करण्याची गरज शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.मराठी विषय दहावी पर्यंत अनिवार्य असलेल्या कायद्यात सुधारणा करून तो बारावी पर्यंत अनिवार्य असेल अशी संबंधित कायद्यात दुरुस्ती करणे हे शासनाने मान्य केलेल्या मराठी भाषा धोरणात नमूद असूनही अद्याप ती दुरुस्ती करण्यात आलेली नाही.



*अमळनेर : रेल्वेस्थानक परिसरात अल्पवयीन मुलीसह तरूणाला ताब्यात घेण्यात आले. यावेळी उपस्थित प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल शिजवळकर, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सोनवणे, पोलीस उपनिरक्षण मधुकर विसावे, पोलीस हवालदार नरेंद्र लोंढे, घोराडे तसेच आरपीएफचे एएसआय कुलभूषण सिंग व हेड कॉन्स्टेबल नंदू पाटील*

# अमळनेर रेल्वे स्थानक परिसरात अल्पवयीन मुलीसह तरुण ताब्यात

## लोहमार्ग पोलिसांची तत्पर कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे तीन वाजेच्या दरम्यान अमळनेर रेल्वे स्थानकावर जीआरपी व आरपीएफचे कर्मचारी नियमित गस्त घालत असताना प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर एक तरुण व त्याच्यासोबत एक अल्पवयीन मुलगी संशयास्पदरीत्या बसलेले आढळून आले. यावेळी पोलिसांना संशय आल्याने दोघांना ताब्यात घेऊन अमळनेर लोहमार्ग पोलीस चौकी येथे चौकशीसाठी आणण्यात आले.

चौकशीदरम्यान दोघांनी समाधानकारक उत्तरे न देता उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांचा संशय अधिक बळावला. त्यानंतर पोलिसांनी मुलीकडून तिच्या वडिलांचा मोबाईल क्रमांक घेत संपर्क साधला असता, संबंधित तरुणाने त्यांच्या अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच या प्रकरणी उत्तर प्रदेशातील मिर्झापूर पोलीस ठाण्यात कायदेशीर तक्रार दाखल केल्याचेही सांगितले.

मुलीच्या पालकांनी व संबंधित पोलिसांनी अमळनेर येथे येईपर्यंत दोघांना पोलिसांच्या ताब्यात ठेवण्याची विनंती केली होती. यानुसार पोलिसांनी तत्काळ कारवाई करत अल्पवयीन मुलीस बालसुधारगृहात रवाना केले..त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर तिच्या पालकांच्या व संबंधित पोलिसांच्या ताब्यात तिला सोपविण्यात आले.

दरम्यान, ताब्यात घेण्यात आलेल्या तरुणाचे नाव राजराम कुमार गुप्ता (वय २२) असे असून तो मूळचा उत्तर प्रदेशातील रहिवासी असून सध्या गुजरात येथे वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे. ही कारवाई नंदुरबार लोहमार्ग पोलीस पोलीस ठाणे अंतर्गत रेल्वे पोलीस ठाणे अमळनेर येथील प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल शिजवळकर, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सोनवणे, पोलीस उपनिरक्षण मधुकर विसावे, पोलीस हवालदार नरेंद्र लोंढे, घोराडे तसेच आरपीएफचे एएसआय कुलभूषण सिंग व हेड कॉन्स्टेबल नंदू पाटील यांनी केली.

# अमळनेरात हिंदू सुर्यकुल वीर शिरोमणी श्री महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी

## आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते पूजन व माल्यार्पण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर तालुका राजपूत एकता मंचतर्फे हिंदू सुर्यकुल वीर शिरोमणी श्री महाराणा प्रतापसिंह यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील महाराणा प्रताप चौक येथील महाराणा प्रताप यांच्या स्मारकस्थळी हा कार्यक्रम संपन्न झाला. माजी मंत्री व आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या स्मारकाचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. यावेळी महाराणा प्रताप यांच्या शौर्याला व स्वाभिमानाला अभिवादन करत समाजबांधवांनी एकजुटीचा संदेश दिला. यावेळी देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमला होता. उपस्थित सर्व मान्यवरांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन केले.

यावेळी अमळनेर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या शहराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राजपूत ऐकता मंचतर्फे चेतन राजपूत यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास संजय पुनाजी पाटील, जयनिल फाऊंडेशनचे अध्यक्ष गौतम अनिल पाटील, नगरसेवक सचिन पाटील, जितेंद्र ठाकूर, कामगार नेते एल टी पाटील, यांच्यासह राजपुत एकता



मंचचे अध्यक्ष रणजित पाटील, नरेंद्रसिंग ठाकूर, अंबरसिंग पाटील, अनिल पाटील, प्रकाश पाटील, ॲड दीपेन परमार, विजयसिंग पवार, गोकुळ पाटील, अजयसिंग पाटील, दीपेन राजपूत, ओंकार राजपूत, भरतसिंग पाटील, ओंकार राजपूत, जितेंद्र पाटील, नरेंद्र पाटील, बापू पाटील, सुनिल पाटील, जयदीप राजपुत, नचिकेत महाले, केदारसिंग राजपूत, विजयसिंग पाटील, दिनेश पाटील, ज्ञानेश्वर राजपूत, विलास राजपूत, मुकेश राजपूत, जयदीप राजपूत, मनोज पाटील, सूरज परदेशी, सर्व राजपूत समाजबांधव आणि महाराणा प्रताप प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महसूल समाधान शिबिरात ६५० नागरिकांनी घेतला योजनांचा लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या “छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान” अंतर्गत शुक्रवारी दि. ८ मे अमळनेर नगरपरिषद येथे विशेष समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला.

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय, अमळनेर यांच्या पुढाकाराने आयोजित या



*अमळनेर : महसूल विभागाने आयोजित केलेल्या शिबिरास योजनेचा लाभ घेतांना लाभार्थी.*

शिबिरात अमळनेर मंडळातील अमळनेर, मंगरूळ, धार, मालपूर, रंजाणे आणि अंलोन या गावांतील नागरिक सहभागी झाले होते. शासनाच्या विविध विभागांनी स्वतंत्र स्टॉल उभारून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि महिलांच्या तक्रारी व समस्या तत्काळ सोडविण्याचा प्रयत्न केला. पान २ वर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

**जय भारत...!**

**जय स्वदेशी...!!**

## दिनविशेष

१० मे

- रायगड किल्ला इंग्रज आणि मराठ्यांमध्ये तह झाला आणि इंग्रजांच्या ताब्यात गेला.
- भारताचे पहिले स्वतंत्रता संग्राम झाले.
- स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लंडनमध्ये १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचा सुवर्ण महोत्सव साजरा केला.
- भारतात प्रथमच मुंबईत रात्रीचा क्रिकेट सामना खेळवण्यात आला.
- संतोष यादव या दोनदा एव्हरेस्ट पर्वत सर करणारी पहिली भारतीय महिला ठरल्या.

**अमळनेर तालुक्यातील १६ शाळांचा १०० टक्के निकाल** पान २ वर

# तेल कंपन्यांना ३० हजार कोटी रुपयांपर्यंतचा तोटा

## पेट्रोल आणि डिझेलच्या किमती लवकरच वाढणार ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पश्चिम आशियाई संघर्षामुळे तेल कंपन्यांना ३० हजार कोटी रुपयांचा प्रचंड तोटा झाला आहे, ज्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या दरात लवकरच वाढ होऊ शकते.

पश्चिम आशियाई संघर्षामुळे जागतिक कच्च्या तेलाच्या बाजारात निर्माण झालेल्या गोंधळापासून आतापर्यंत सर्वसामान्य जनता वाचली आहे, पण ही परिस्थिती फार काळ टिकेल असे दिसत नाही. सरकारने अनेक उपाययोजना करूनही, तीन सरकारी तेल कंपन्यांना (इंडियन ऑइल, हिंदुस्तान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम) पेट्रोलियम उत्पादनांच्या विक्रीतील तोटा सहन करणे आता कठीण जात आहे.पेट्रोलियम मंत्रालयाच्या अंदाजानुसार, केवळ मार्च आणि एप्रिल महिन्यांतच या तीन कंपन्यांना एकत्रितपणे ३० हजार कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. जर केंद्र सरकारने उत्पादन शुल्क कमी करून त्यांना मदत केली नसती, तर हा तोटा ६२,५०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असता.कार्यकारी मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १२० डॉलरच्या वर गेल्या, तेव्हा सरकारवर पेट्रोलवर प्रति लिटर अंदाजे २४ रुपये आणि डिझेलवर प्रति लिटर अंदाजे ३० रुपयांचा बोजा पडला. केंद्र सरकारने उत्पादन शुल्क प्रति लिटर १३ रुपयांवरून ३ रुपये आणि डिझेलवरील १० रुपयांवरून शून्य करून हा तोटा कमी करण्यास मदत केली आहे, परंतु यामुळे केंद्र सरकारला महसुली तोटाही झाला आहे.पश्चिम आशियाई संघर्षाला आता अकरावा आठवडा सुरू झाला आहे आणि सध्याची व्यवस्था अनिश्चित काळासाठी चालू ठेवता येणार नाही. तरीही, जगाच्या तुलनेत भारतीय ग्राहक पेट्रोलच्या महागाईपासून सुरक्षित राहिले आहेत.या काळात, हाँगकाँगमध्ये पेट्रोलच्या किमती २५ टयांनी, सिंगापूरमध्ये ३० टयांनी आणि इटली, जर्मनी व फ्रान्ससारख्या देशांमध्ये ३५-३० टयांनी वाढल्या आहेत. दरम्यान, भारतात पेट्रोलच्या किमती प्रति लिटर अंदाजे ९५-९६ रुपयांवर स्थिर आहेत.अनेक लहान देशांनी आणखी कठोर उपाययोजना केल्या आहेत, जसे की बांगलादेशने इंधन शिधावाटप लागू केले आहे, श्रीलंकेने चार दिवसांचा कामाचा आठवडा लागू केला आहे, फिलीपिन्सने राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी जाहीर केली आहे आणि पाकिस्तान व तैवानमध्ये निर्बंध लादले आहेत.किरकोळ किमती वाढवून पेट्रोलियम व्यापार सुव्यवस्थित न केल्यास, पेट्रोलियम उत्पादनांचे सामरिक साठे तयार करणे, देशभरात गॅस




पाइपलाइन टाकणे आणि रिफायनरी क्षमता वाढवणे यांसारख्या ऊर्जा सुरक्षा प्रकल्पांवर परिणाम होऊ शकतो.भारताचा सध्याचा सामरिक पेट्रोलियम साठा केवळ ५.३३ दशलक्ष टन आहे, जो अंदाजे १५ दिवसांच्या आयातीइतका आहे. एलपीजीसाठी ३० दिवसांचा समर्पित साठा तयार करण्याची योजना आहे. पश्चिम आशियातील संकटानंतर या योजनांना गती देण्याची गरज आहे. रिफायनरी १०० टक्केपेक्षा जास्त क्षमतेने कार्यरत आहेत, जे जास्त काळ टिकणारे नाही.

## संपादकीय

# यशाचे ‘दहावी’त पाऊल आणि उद्याची आव्हाने

महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे डोळे लागून राहिलेला दहावीचा निकाल अखेर जाहीर झाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही निकालाची टक्केवारी आणि यशाचा आलेख चढता राहिला आहे. हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नसून, बदलत्या शिक्षण पद्धतीशी जुळवून घेणाऱ्या संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेचे आहे. मात्र, या निकालाच्या लखलखाटात काही मूलभूत प्रश्न आणि भविष्यातील आव्हाने यांचा विचार करणेही तितकेच गरजेचे आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. एकूण ३५ विषयांपैकी १२ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. १०० टक्के निकाल लागणाऱ्या शाळांची संख्याही वाढताना दिसत आहे. एकीकडे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांच्या गुणांची टक्केवारी वाढत आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर प्रथम भाषा म्हणून मराठी भाषेची निवड करून परीक्षा देणाऱ्या राज्यातील सुमारे १० लाख ८७ हजार ६९९ विद्यार्थ्यांपैकी ८० हजार ८०३ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याचे धक्कादायक चित्र आहे.इयत्ता दहावीत द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून मराठी भाषेची निवड करून एकूण ४ लाख १३ हजार ९१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, त्यापैकी १३ हजार ७४१ विद्यार्थी नापास झाले आहेत. ज्या राज्याची राजभाषा मराठी आहे, ज्या भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे, अशा मराठी भाषेतच राज्यातील सुमारे ९४ हजार ५४४ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत.

यंदाच्या निकालातही मुलींनीच बाजी मारली आहे. ही आता केवळ एक आकडेवारी राहिलेली नसून ती एक सामाजिक क्रांती आहे. प्रतिकूल परिस्थितीतही मुली शिक्षणाच्या प्रवाहात स्वतःला सिद्ध करत आहेत, हे कौतुकास्पद आहे. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांत मुलींच्या यशाचे प्रमाण मुलांच्या तुलनेत अधिक असणे, हे स्त्री-शिक्षणाच्या दृष्टीने सकारात्मक लक्षण आहे.निकालाची टक्केवारी ९० टक्क्यांच्या पार जाणे आता नित्याचे झाले आहे. ९० टक्केहून अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या हजारोंच्या घरात आहे. ही बाब आनंददायी असली तरी, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये एक प्रकारची ‘गुणांची स्पर्धा’ निर्माण झाली आहे.महत्त्वाची बाब केवळ कागदावरचे गुण म्हणजे गुणवत्ता नव्हे. वाढत्या टक्क्यांमुळे अकरावी प्रवेशासाठी होणारी चढाओढ आणि नामांकित महाविद्यालयांचे गगनचुंबी ‘कट-ऑफ’ यामुळे सरासरी गुण मिळवणारा विद्यार्थी आजही दडपणाखाली आहे.केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा देऊन तिचा सन्मान केला आहे. पण हा सन्मान केवळ कागदोपत्री किंवा सरकारी निर्णयांपुरता मर्यादित राहणार का, असा प्रश्न पडतो. जर आपल्या मातीतली मुले आपल्याच मायबोलीत अनुत्तीर्ण होत असतील, तर त्या अभिजात दर्जाचा अभिमान बाळगताना मनात शंका येते. इंग्रजी माध्यमाचे आकर्षण आणि घरातील संवादातून हद्दपार होत चाललेली शुद्ध मराठी, यामुळे विद्यार्थ्यांची या भाषेवरची पकड सुटत चालली आहे.शंभर टक्के निकाल लावणाऱ्या शाळांची संख्या वाढली असली, तरी त्या निकालात ‘गुणवत्तेचा’ आणि विशेषतः भाषेचा कस किती आहे, हे तपासण्याची वेळ आली आहे. मराठी भाषा केवळ परीक्षेचा एक विषय न राहता, ती संवादाचे आणि आनंदाचे माध्यम बनली पाहिजे.केवळ गुणपत्रकावर टक्केवारीचे आकडे फुगवून चालणार नाही. जर पुढची पिढी आपली भाषा धड लिहू किंवा वाचू शकत नसेल, तर हे शैक्षणिक यश पोकळ ठरेल.सरकार, शिक्षण संस्था आणि पालकांनी आता गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मराठी भाषेचा निकाल सुधारण्यासाठी शाळांमध्ये विशेष उपक्रम राबवणे, वाचन संस्कृती जोपासणे आणि मराठी विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे अनिवार्य आहे. अन्यथा, मराठी पाऊल पडते पुढे असे म्हणत असताना, भाषेच्या बाबतीत आपण मागे तर पडत नाही ना, याची भीती कायम राहील.

दहावीचा निकाल हा केवळ एका टप्प्याचा शेवट नसून एका नवीन प्रवासाची सुरुवात आहे. आजचे युग हे केवळ पदव्यांचे नसून कौशल्यांचे आहे. १०वी नंतर कला, वाणिज्य आणि विज्ञान या पारंपरिक शाखांच्या पलीकडे जाऊन व्यावसायिक अभ्यासक्रम,तंत्रशिक्षण,डिझाइन आणि क्रिएटिव्ह फील्ड्स यांकडे विद्यार्थ्यांनी वळण्याची गरज आहे. केवळ मेंटल एबिलिटी नाही तर मार्केट एबिलिटी वाढवणे हे आजच्या काळाचे आव्हान आहे.ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित गुण मिळाले नाहीत किंवा जे अनुत्तीर्ण झाले आहेत, त्यांच्यासाठी हा शेवट नाही. ‘एक निकाल तुमचे भविष्य ठरवू शकत नाही’ हे पालकांनी आपल्या पाल्यांना पटवून देणे आवश्यक आहे. पुनर्रचित परीक्षा आणि कौशल्य विकास योजनांच्या माध्यमातून पुन्हा उभारी घेण्याची संधी सरकारने उपलब्ध करून दिली आहे, तिचा लाभ घेणे श्रेयस्कर ठरेल.दहावीच्या या निकालाने महाराष्ट्राच्या युवा पिढीच्या कष्टाला फळ दिले आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतानाच, त्यांनी केवळ गुणांच्या मागे न धावता खऱ्या अर्थाने ‘ज्ञानी’ होण्याचा प्रयत्न करावा. शिक्षण मंडळानेही निकालाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि गुणांकनाच्या पद्धतीत काळानुरूप बदल करणे अपेक्षित आहे. शेवटी, हा निकाल म्हणजे उद्याच्या समर्थ महाराष्ट्राची पायाभरणी आहे, जी भक्कम असणे काळाची गरज आहे!

# अमळनेर तालुक्यातील १६ शाळांचा १०० टक्के निकाल

## तालुक्याचा दहावीचा निकाल ९१.८८ टक्के; विद्यार्थ्यांना आता अकरावी प्रवेशाचे वेध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्याचा दहावीचा निकाल ९१.८८ टक्के लागला आहे. यंदाही निकालाच्या टक्केवारीत मुलांच्या तुलनेत मुलींनीच बाजी मारली असून, तालुक्यातील १६ शाळांनी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.तालुक्यातील एकूण ७४ शाळांमधून ३ हजार ८०० विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते.त्यापैकी ३ हजार ४६७ विद्यार्थ्यांनी यशाची पायरी ओलांडली आहे. निकालाची आकडेवारी पाहता, ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांतील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केल्याचे दिसून येते. तालुक्यातील ७४ शाळांपैकी १६ शाळांचा निकाल पूर्ण १०० टक्के लागला आहे. यात पी. बी. ए. इंग्लिश मीडियम स्कूल अमळनेर, महात्मा ज्योतिराव फुले हायस्कूल देवगाव, माध्यमिक विद्यालय कुऱ्हे एस. एच. मुंदडे हायस्कूल मारवड, स्व. एस. जी. सोनवणे माध्यमिक विद्यालय भरवस, नंदादीप माध्यमिक विद्यालय निम, एकात्मता माध्यमिक विद्यालय शहापूर, नूतन माध्यमिक विद्यालय अंतुर्ली रंजाने, सतगुरु पब्लिक स्कूल चोपडाइ, यशवंत आदिवासी आश्रमशाळा पिंपळे बु, आर्मी स्कूल अमळनेर, माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा ताडेपुरा, सेंट मेरी इंग्लिश मीडियम हायस्कूल अमळनेर, माध्यमिक विद्यालय बोहरे, माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा अंतुर्ली रंजाने आणि एन.टी.मुंदडा ग्लोबल स्कूल अमळनेर या शाळांचा समावेश आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि १०० टक्के निकाल लावणाऱ्या शाळांच्या मुख्याध्यापकांचे व शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. दहावीच्या निकालानंतर आता अकरावी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना वेध लागले आहेत.



अमळनेर : जी. एस. हायस्कूलचे यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत संस्थेचे चेअरमन हरी भिका वाणी, निरज अग्रवाल, जितेंद्र जैन, मुख्याध्यापक व्हि. एम. पाटील, ए.डी. भदाणे आदी.

# जी. एस.हायस्कूलचा ९०.१२ टक्के निकाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या जी. एस.हायस्कूलचा दहावीचा निकाल ९०.१२ टक्के लागला आहे.शाळेतून दर्शन निंबा पाटील (९३.२०) प्रथम तर राम रवींद्र महाजन (९२.४०) द्वितीय आला आहे.शाळेतून बोर्डाच्या परीक्षेसाठी ३२६ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते.त्यापैकी २९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.७६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून ११० विद्यार्थी प्रथम श्रेणीत पास झालेले आहेत.शाळेच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्याध्यक्ष निरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन,शाळेचे चेअरमन हरी भिका वाणी, मुख्याध्यापक व्हि. एम.पाटील, उपमुख्याध्यापक ए. डी. भदाणे, पर्यवेक्षक एस.आर. शिंगाणे, सी.एस.सोनजे, संस्थेचे शिक्षक प्रतिनिधी राहुल पाटील,मुख्य लिपीक जयश्री भालेराव तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# जय योगेश्वर माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.६० टक्के

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जयेश कोळी



दीपक पारधी



नैतिक पाटील

अमळनेर : येथील जय योगेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षा मार्च-२०२६ चा निकाल ९८.६० टक्के लागला असून एकूण ९४ विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते.इ.१० वीच्या परिक्षेत जयेश दत्तू कोळी याने ९४ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक , दीपक सुनील पारधी याने ९३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर नैतिक केशवराव पाटील याने ९०.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब डी. डी. पाटील ,उपाध्यक्ष तथा प्राचार्य रावसाहेब के.डी पाटील , सचिव दादासो.राधेश्याम पाटील ,खजिनदार दादासो.शैलेंद्र दत्तात्रेय पाटील , संचालिका प्रा डॉ. नयना कैलास पाटील, संचालक बापूसो नंदकुमार डी. पाटील व सर्व संचालक मंडळाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# द्रौपदीबाई रामचंद्रशेठ कन्याशाळेचा एसएससी निकाल ९४ टक्के


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



कावेरी चौधरी



श्रावणी मोरे



गार्गी जोशी

अमळनेर : येथील श्रीमती द्रौपदीबाई रामचंद्रशेठ भांडारकर कन्या शाळेत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९४ टक्के लागला असून, शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. निकाल जाहीर होताच शाळा परिसरात विद्यार्थिनी, पालक व शिक्षकांनी आनंदोत्सव साजरा केला.यंदा शाळेतून एकूण २८३ विद्यार्थिनी परीक्षेस बसल्या होत्या. त्यापैकी २६४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून १९ विद्यार्थिनी एटीकेटीमध्ये आहेत. शाळेतील विद्यार्थिनींनी गुणवत्तापूर्ण यश संपादन करत विशेष प्राविण्य व प्रथम श्रेणीत मोठ्या संख्येने यश मिळविले आहे.शाळेतून कावेरी मुकेश चौधरी हिने ९२.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. श्रावणी मनेश मोरे हिने ९१.६० टक्के गुणांसह द्वितीय, तर गार्गी सुनिल जोशी हिने ९०.६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच प्रांजल चेतनानंद उपासनी हिने ८९.८० टक्के गुणांसह चौथा, तर गुंजन दिनेश पाटील हिने ८९.६० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक मिळविला.निकालानुसार ५६ विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य मिळविले असून ११३ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. तसेच ६४ विद्यार्थिनी द्वितीय श्रेणीत व ३१ विद्यार्थिनी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल शिक्षकवर्ग, पालक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. शाळेचे चेअरमन जितेंद्र जैन , मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे व पालकांच्या सहकार्यामुळे हे यश संपादन करता आल्याचे त्यांनी सांगितले.





पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम व उद्योजक , माजी उपनगराध्यक्ष पांडुरंग महाजन यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना मंगळ ग्रह सेवा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर जी चव्हाण साहेब जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी

# महसूल समाधान शिबिरात ६५० नागरिकांनी घेतला योजनांचा लाभ

**पान १ वरून**

शिबिरास तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, निवासी नायब तहसीलदार एस. यू. पाटील, पुरवठा निरीक्षक अधिकारी आर. जे. शेख, महिला व बालकल्याण अधिकारी पेमन्ना पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पुरवठा शाखेमार्फत ८ नवीन शिधापत्रिका व दुबार शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. संजय गांधी योजना शाखेत राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांना धनादेश वाटप करण्यात आले तसेच ६५ डीबीटी प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या. याशिवाय वृद्धापकाळ व श्रावणबाळ योजनांसाठी हयात प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले.

तहसील कार्यालयामार्फत ४१ फेरफार प्रकरणांचे निकाल काढण्यात आले तसेच ३७७ सातबारा उताऱ्यांचे वितरण करण्यात आले. सेतू शाखेतून ९० उत्पन्न दाखले, ६५ राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रे, ५६ रहिवासी दाखले आणि ५० जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच १२१ आधार नोंदणी व ५९ आधार दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली. महिला व बालविकास विभागाकडून ३० लाभार्थ्यांना बेबी किटचे वाटप करण्यात आले. याशिवाय विद्यारंभ प्रमाणपत्रे, प्रधानमंत्री मातृत्व योजना, लेक लाडकी योजना तसेच पोषण आहार योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना कृषी अवजारांचे वाटप करण्यात आले, तर महावितरण विभागाने नवीन वीज जोडणीसाठी आदेश वितरित केले. या समाधान शिबिरात अंदाजे ६०० ते ६५० नागरिकांनी उपस्थिती नोंदवून शासनाच्या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी संजय गांधी योजना नायब तहसीलदार राजेंद्र ढोले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कलाली येथे घरफोडी, चोरट्यांनी दागिन्यांसह रोख रक्कम केली लंपास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील कलाली येथे ८ रोजी पहाटे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून दागिन्यांसह रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

तेजस गुलाब पाटील याने दिलेल्या फिर्यादीवरून, ८ रोजी रात्री घरातील सर्व जण गच्चीवर झोपले होते. सकाळी ४ वाजता फिर्यादीची आई उठली असता तिला घराचा कडीकोंडा तुटलेला दिसून आला. त्यावेळी सर्वांनी घरात जाऊन पाहिले असता घरातील कपाट गायब असल्याचे लक्षात आल्याने कपाटाचा शोध घेतला असता ते फिर्यादीच्या काकाच्या घराच्या बाजूला बाहेर पडलेले होते. कपाटातील सोन्याच्या २ ग्रॅम वजनाच्या रिंगा, ६ भार वजनाचे चांदीचे जोड बेले, ४ भार वजनाचे चांदीचे ब्रेस्लेट, ५ भार वजनाच्या चांदीच्या लक्ष्मी, व ४० हजार रुपये रोख असा ६१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास असल्याचे लक्षात आले. याप्रकरणी मारवड पोलिसांत तक्रार दाखल केली असून पुढील तपास पीएसआय संजय श्रावण पाटील हे करीत आहेत.



# ‘कहीं की कलेक्टर हो क्या,’ तानों का जवाब देने के लिए बनीं आय.ए.एस.





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कभी-कभी समाज के कटाक्ष, लोगों की बातें और तानें कुछ बड़ा करने का जुनून लेकर आते हैं। प्रियंका शुक्ला की कहानी भी कुछ ऐसी ही है, जिन्होंने तानों को अपनी ताकत बना लिया। एक महिला ने जब उनसे कहा कि ‘कहीं की कलेक्टर हो क्या’ तो यह उनके दिल में इस तरह उतरा कि उन्होंने अपनी पूरी जिंदगी की दिशा बदल दी। डॉक्टरी छोड़कर उन्होंने यूपीएससी की तैयारी शुरू कर दी। रास्ता कठिन था, असफलताएं भी मिलीं, लेकिन उन्होंने हार नहीं मानी। एक दिन आत्मविश्वास और मजबूत इरादों से वह आय.ए.एस. बनीं। प्रियंका शुक्ला उत्तर प्रदेश की रहने वाली हैं। वह बचपन से ही पढ़ाई में तेज थीं। उनका सपना डॉक्टर बनकर लोगों की सेवा करना था। पढ़ाई में मेहनत और लगन से उन्होंने मेडिकल प्रवेश परीक्षा पास की और लखनऊ की किंग जॉर्ज मेडिकल यूनिवर्सिटी में एडमिशन लिया। साल २००६ में उन्होंने एम.बी.बी.एस. की पढ़ाई पूरी की थी। इसके बाद वह डॉक्टर बन गईं।डॉक्टरी करते-करते एक बार प्रियंका स्लम एरिया में गईं। वहां उन्होंने देखा कि एक महिला गंदा पानी पी रही थी और बच्चों को भी वही पानी दे रही थी। प्रियंका ने जब उसे समझाने की कोशिश की तो महिला ने कि क्या तुम कहीं की कलेक्टर हो? जो मुझे बता रही हो। यह बात प्रियंका के दिल को छू गई। उसी पल उन्होंने तय कर लिया कि अब तानों का जवाब प्रशासनिक सेवा में जाकर ही देना है।डॉक्टरी छोड़ने के फैसले के बाद उन्होंने यूपीएससी की तैयारी पर पूरा फोकस किया। यह सफर आसान नहीं था क्योंकि देश की सबसे कठिन परीक्षाओं में से एक को पास करने के लिए लगातार मेहनत और धैर्य चाहिए। पहले प्रयास में उन्हें असफलता मिली थी लेकिन उन्होंने हार नहीं मानी। अपनी कमजोरियों पर ध्यान देते हुए दोबारा तैयारी की। २००९ में उन्होंने UPSC परीक्षा में ७३वीं रैंक हासिल कर आय.ए.एस.अधिकारी बनी थीं।आय.ए.एस. बनने के बाद प्रियंका शुक्ला को छत्तीसगढ़ कैडर मिला। उनकी पहली पोस्टिंग जशपुर जिले में हुई, जहां उन्होंने लोगों की समस्याओं को समझकर कई अच्छे काम किए। उनकी कार्यशैली और लोगों से जुड़ाव ने उन्हें जनता के बीच लोकप्रिय बना दिया। कोरोना महामारी के दौरान भी उन्होंने स्वास्थ्य सेवाओं को संभालने में अहम भूमिका निभाई। डॉक्टर और अफसर दोनों जिम्मेदारियों को निभाने के लिए उन्हें राष्ट्रपति मेडल से सम्मानित किया गया।प्रियंका शुक्ला सिर्फ एक आय.ए.एस अधिकारी ही नहीं बल्कि एक अन्य चीजों को लेकर सुर्खियों में रहती हैं। प्रशासनिक जिम्मेदारियों के साथ-साथ उन्हें डांस, कविता और पेंटिंग का भी शौक है। वे प्रोफेशनल कंटेम्परेरी डांसर हैं और खाली समय में अपनी कला को समय देती हैं। उनकी यही खासियत उन्हें दूसरों से अलग बनाती है। प्रियंका की कहानी यह सिखाती है कि मेहनत, आत्मविश्वास और जुनून से इंसान हर सपना पूरा कर सकता है।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# मराठी मातीचा सुगंध : शब्दप्रभू जगदीश खेबूडकर



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष


मराठी चित्रपटसृष्टीतील गीतकार म्हटले की पहिले नाव ओठावर येते ते म्हणजे जगदीश खेबूडकर. आपल्या अवीट गोडीच्या शब्दांनी त्यांनी रसिक प्रेक्षकांच्या मनावर तब्बल पाच दशके अधिराज्य गाजवले. १० मे १९३२ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील हळदी या गावी त्यांचा जन्म झाला.

जगदीश खेबूडकर यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःला एका चौकटीत अडकून ठेवले नाही. त्यांनी लिहिलेल्या गाण्यांमध्ये मानवी भावनांचे सर्व रंग पाहायला मिळतात. लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया किंवा विठू माऊली तू माऊली जगाची अशी भावपूर्ण भक्तिगीते तर तुम्हावर केली मी मर्जी बहाल किंवा दिसला गं बाई दिसला अश्या सौदर्य विशिष्ट लावण्या ग्रामीण बाज असलेली शृंगारिक आणि भावगीते त्यांची गाणी आजही तितकीच टवटवीत वाटतात.मराठी सिनेसृष्टीत जगदीश खेबूडकर, संगीतकार राम कदम आणि दिग्दर्शक व्ही. शांताराम या त्रिकुटाने इतिहास घडवला. पिंजरा या चित्रपटातील त्यांची सर्व गाणी आजही घराघरांत ऐकली जातात. ग्रामीण संस्कृती, शेतकरी, कष्टकरी आणि मातीचा गंध त्यांच्या शब्दांतून जिवंत होत असे.जगदीश खेबूडकर यांनी केवळ चित्रपटच नाही, तर नाटक, लोकनाट्य आणि शैक्षणिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या नावावर काही महत्त्वाचे विक्रम आहेत.

३०० हून अधिक चित्रपटांसाठी गीतलेखन,३५०० हून अधिक गीतांची रचना त्यांनी केली.कोल्हापुरी मातीशी त्यांची नाळ शेवटपर्यंत जोडलेली होती. प्रसिद्धीच्या झोतात राहूनही त्यांचे पाय कायम जमिनीवर होते. जगदीश खेबूडकर म्हणजे गाण्यांचे चालते-बोलते विद्यापीठ असे त्यांच्याबद्दल आदराने म्हटले जाते. त्यांच्या शब्दांनी अनेक नायकांना मोठे केले आणि अनेक चित्रपटांना म्युझिकल हिट बनवले.३ मे २०११ रोजी या शब्दप्रभूने जगाचा निरोप घेतला, पण त्यांनी दिलेली गाणी आजही मराठी माणसाच्या सुखात-दुखात सोबत करतात. कुठं वळणाचं वळण... म्हणत मनाला साद घालणारा हा महान साहित्यिक मराठी संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे.जगदीश खेबूडकर म्हणजे केवळ गीतकार नाहीत, तर ते मराठी मनाच्या स्पंदनांना शब्दबद्ध करणारे किमयागार आहेत.

**आजच्या त्यांच्या जयंतीनिमित्त या थोर शब्दप्रभूस दै. ग्लोबल महातेज च्या वतीने विनम्र अभिवादन!**

# जगातील सर्वात महागडी पाण्याची बाटली



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आता केवळ गाड्या किंवा डिझायनर कपडेच महाग राहिलेले नाहीत. या यादीमध्ये अशीही उत्पादने आहेत जी रोजच्या वापरातील आहेत. पाण्याच्या बाटलीसारखी एक साधी वस्तू सुद्धा, जेव्हा लक्झरी श्रेणीत ठेवली जाते, तेव्हा तिची किंमत लाखो ते कोटींपर्यंत असू शकते. या श्रेणीत नेहमी चर्चेत असणारे एक नाव म्हणजे अक्वा दी क्रिस्टालो ट्रिब्युटो अ मोडिग्लियानी. ही केवळ एक बाटली नाही, तर लक्झरी आणि विशेषतेचे प्रतीक आहे, जी जगातील सर्वात महागड्या पाण्याच्या बाटल्यांपैकी एक मानली जाते.

एखादे उत्पादन इतके महाग असेल, तर ते अनेकदा श्रीमंतांशी जोडले जाते. या बाटलीचे सर्वात लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणजे तिची रचना. ही अंदाजे ७५० मिलीची काचेची बाटली २४ कॅरेट सोन्याने मढवलेली आहे. याचा अर्थ ती केवळ एक उपयुक्त वस्तू न राहता, एक शोभेची वस्तू किंवा संग्राहकाची वस्तू बनते. यामुळेच जे लोक हे विकत घेतात, ते याला त्याच्या मूळ वापरापेक्षा आपल्या जीवनशैलीचा एक भाग मानतात. या बाटलीची किंमतच तिला खास बनवते. असे म्हटले जाते की याची किंमत ५० लाख रुपयांपर्यंत आहे, तर काही मर्यादित आवृत्त्या (लिमिटेड एडिशन्स) त्याहूनही अधिक महाग असू शकतात.

ही किंमत याला एका प्रीमियम श्रेणीत ठेवते, जी दैनंदिन वापरापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. या बाटलीतील पाणी फिजी, फ्रान्समधील नैसर्गिक झरे आणि आईसलँडमधील हिमनद्या यांसारख्या विविध ठिकाणांहून येते असे म्हटले जाते. आरोग्याच्या दृष्टिकोनातून, अक्वा दी क्रिस्टालो ट्रिब्युटो अ मोडिग्लियानीबद्दल केलेल्या मोठ्या दाव्यांना पाठिंबा देणारा कोणताही ठोस पुरावा नाही. हे पाणी अत्यंत अल्कधर्मी (अल्कलाईन) आहे किंवा त्यात सोने आहे असे म्हटले जाते; परंतु डॉक्टर आणि विज्ञानाचा असा विश्वास नाही की, यामुळे कोणतेही महत्त्वपूर्ण फायदे मिळतात. सोप्या भाषेत सांगायचे तर, तुमच्यासाठी केवळ चांगले, स्वच्छ पाणी पुरेसे आहे!

# ६७ व्या वर्षीही फिट असलेल्या नीतू कपूर चटक-मटक पदार्थ खाणे टाळतात



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लोक अनेकदा घरात बसण्यासाठी वयाचे कारण देतात. पण नीतू कपूर त्या एक सेलिब्रिटींपैकी आहेत, ज्यांनी एक विशिष्ट वय ओलांडल्यानंतर आपल्या करिअरला पुन्हा सुरुवात केली. नीतू कपूर ६७ वर्षांच्या असूनही अजूनही सक्रियपणे काम करत आहेत. त्यांचा चेहरा तेजस्वी दिसतो. सोहा अली खानने त्यांना तिच्या पॉडकास्टमध्ये हाच प्रश्न विचारला.सोहाने विचारले की, या वयातही त्या इतक्या तरुण कशा राहतात. नीतू कपूर म्हणाल्या, "मी पॉडकास्टवर ऐकलं आहे की लोक म्हणतात, 'सकाळी उठा आणि हे प्या, ते प्या.' मला ते अजिबात आवडत नाही."

त्या म्हणाल्या, "मुद्दा हा आहे की आपण आपल्या खाण्यापिण्याकडे आणि व्यायामाकडे लक्ष दिले पाहिजे. मी योगा आणि व्यायाम करते. मी सकाळी उठून हात जोडून देवाचे आभार मानते.मग मी बाहेर जाऊन सूर्याकडे बघते आणि एक दीर्घ श्वास घेते. मला समजत नाही की हे सनस्क्रीन कशासाठी तयार केले गेले. मी माझ्या आयुष्यात कधीही सनस्क्रीन वापरले नाही."त्या म्हणतात की सनस्क्रीन लावत नाही, पण माझ्या त्वचेत रंगद्रव्यच नाही. सनस्क्रीन इंग्रजांसाठी आहे, ज्यांची त्वचा खूप गोरी असते. मी आयुष्यभर उन्हात काम केले आहे. आजही मी रोज अर्धा तास उन्हात बसते.सनस्क्रीन आणि रेड वाईन दोन्ही मार्केटिंग आहे. रेड वाईन म्हणजे फक्त साखर; सौंदर्य आतून येते. ते तुम्ही काय खाता यातून येते. वाईनऐवजी बीट, चिया सीड्स आणि सब्जा खा. मला भारतीय जेवण आवडते.

नीतू कपूर म्हणतात, "मी अॅव्होकॅडो खात नाही. मला पास्ता आवडत नाही कारण ते फक्त पीठ असते. मी चपाती, भात आणि भरपूर भाज्या खाते. मी मासे आणि अंडी खाते. आम्ही डाएटवर विश्वास ठेवत नाही. आम्ही चांगले आणि माफक प्रमाणात खाण्यावर विश्वास ठेवतो.माझा विश्वास आहे की घरचे जेवण सर्वात आरोग्यदायी असते. दोडका, दुधी भोपळा आणि भरीत हे खूप चांगले पदार्थ आहेत." नीतू कपूर यांनी असेही सांगितले की ऋषी कपूर यांच्या निधनानंतर त्या दोन महिने झोपू शकल्या नाहीत.त्या सांगतात , "मला दारूचं व्यसन होते." मी माझ्या डॉक्टरला फोन करून सांगितले की माझ्यासोबत असे घडत आहे. त्या खूप चांगल्या डॉक्टर आहेत. त्या खूप व्यस्त असतात. पण माझे त्यांच्याशी चांगले नाते होते. त्या रोज सकाळी ११ वाजता माझ्या घरी यायच्या, मला इंजेक्शन द्यायच्या आणि मी झोपेपर्यंत माझ्यासोबत राहायच्या. हे १२ दिवस चालले.


नीतू कपूर सांगतात की, १२ दिवसांनंतर मी माझ्या डॉक्टरला सांगितले की मला आता त्याची गरज नाही. मी त्यातून पुढे गेले होते. त्यामुळे, आजकाल थेरपी कशी असते हे मला माहीत नाही. पण जेव्हा तुम्ही वेदनेत असता, तेव्हा तुम्हाला अशा एका चांगल्या मित्राची गरज असते जो तुमचे दुःख वाटून घेऊ शकेल, थेरपीची नाही. मी कधीच थेरपी घेतली नाही.नीतू कपूर यांचा 'दादी की शादी' हा चित्रपट ८ मे रोजी प्रदर्शित झाला. त्यांची मुलगी रिद्धिमा कपूरने या चित्रपटातून पदार्पण केले.

# पावसाचा आवाज बियांना ऐकू येतो, मग त्या अंकुरतात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पावसाचा टप..टप...असा आवाज केवळ आपले मनोरंजन करत नाही तर मातीच्या आत लपलेल्या बियांना देखील जीवनाचा संदेश देतो. त्यामुळे रोपटी आपल्या आजूबाजूच्या ध्वनींना ऐकत असतात, त्यांना अनुभवू शकतात आणि त्यानुसार प्रतिक्रिया देखील देऊ शकतात ! झाडांना संवेदना असतात, झाडे सजिव असतात हे आपणाला माहिती आहे. मात्र, झाडांच्या बिया देखील प्रचंड संवेदनशील असतात. त्यांना पावसाच्या पहिल्या थेंबांचा आवाज देखील ऐकू येत असतो. त्यामुळे त्या जागे होतात आणि वेगाने अंकुरित होऊ लागतात असे नवीन संशोधनातून स्पष्ट झाले आहे. पावसाच्या थेंबांचा हा टप..टपआवाज त्यांच्यासाठी जीवन सुरु करण्याचा संकेत बनतो असे संशोधकांनी उघड केले आहे.

अमेरिकेतील प्रतिष्ठीत मॅसाचुसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या संशोधकांनी हा रंजक शोध लावला आहे. एमआयटीच्या संशोधकांनी केलेल्या अभ्यासात खास करुन तांदुळाच्या बाबतीत असे आढळले की धानाच्या बिया पावसाचा आवाज ऐकून ३० ते ४० टक्के वेगाने अंकुरीत होतात. म्हणजे पावसाच्या थेंबांचा टप-टपचा आवाज त्यांना वेळेच्या



आधीच अंकुरीत होण्यास मदत करते. हा शोध त्या समजूतीला बदलत आहे ज्यात आपण आधी रोपट्यांना निष्क्रिय आणि बेजीव मानत होतो.बिया केवळ ओलावा आणि पाण्याची वाट पाहात नाहीत तर आपल्या आजू बाजूच्या परिसराचा अंदाज घेऊन त्यानुसार निर्णय घेतात आता अंकुरित होण्याची योग्य वेळ आली आहे की नाही असे संशोधकांचे म्हणणे आहे.

पावसाचे थेंब जेव्हा मातीवर किंवा पाण्यावर ध्वनी तरंगे निर्माण करतात. हे ध्वनी तरंग माती आणि पाण्याच्या आत व्हायब्रेशन निर्माण करतात आणि बिया या कंपनांचा अनुभव घेऊ शकतात आणि त्यांनी ती जाणवतात. संशोधकांच्या मते बियांच्या आता स्टॅटोलिथ नावाचे खूप छोटे कण असतात. हे कण स्टार्च पासून बनलेले असतात. जेव्हा पावसाच्या आवाजाने निर्माण झालेले व्हायब्रेशन या स्टॅटोलिथला हलवतात तेव्हा बियांना संकेत मिळतो की आता पुरेसे पाणी येणार आहे.आणि हा माहोल त्यांच्या उगवण्यासाठी अनुकूल आहे. त्यामुळेच मग बिया वेगाने अंकुरित होऊ लागतात.

एमआयटीच्या संशोधकांनी या गोष्टीला सिद्ध करण्यासाठी धानाच्या सुमारे ८ हजार बियांवर प्रयोग केला. काही बियांना सामान्य ओलावा दिला. तर काही बियांना पावसासारखा आवाज आणि पाण्याचा थेंबाचा प्रभाव टाकला की ज्या बियांना पावसाचा आवाज ऐकायला दिला ते ३० -४० टक्के वेगाने अंकुरित झाले.

पाण्यात ध्वनींचे तरंग जास्त चांगले पसरतात. त्यामुळे पाणी वा ओली मातीच्या आतील बिया या आवाजांना चांगल्या प्रकारे अनुभवू शकतात.हा अभ्यास सिद्ध करतो की रोपे आपल्या विचारांहून अधिक जास्त समजदार आणि संवेदनशील असतात. केवळ प्रकाश, पाणी आणि मातीवर ते अवलंबून नसतात, तर ते आवाज आणि कंपनांना देखील अनभवू शकतात.आधीच्या अभ्यासात असे आढळले होते की रोपे किटकांच्या चावण्याच्या आवाज ऐकून आपल्या पानांत कडू रसायन बनवतात. काही रोपे स्पर्श केल्यावर बंद होतात. काही सुगंधांना रिएक्ट करतात. आता पावसाचा आवाज ऐकण्याची क्षमताही यात सामील झाली आहे.हे संशोधन कृषी विज्ञानासाठी देखील खूप महत्वाची ठरु शकते. जर योग्य आवाज वा कंपने देऊन बियांना वेगाने अंकुरित केले जाऊ शकले तर पिके लवकर तयार होऊ शकतात आणि शेतकऱ्यांना फायदा होईल.

## उन्हाळयात रात्रीचे जेवण कसे असावे ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**पास्ता सॅलड :** शिजवलेला पास्ता, पालेभाज्या आणि औषधी वनस्पती एकत्र करून थंड खाल्ल्यास पोट भरते.

**फळ आणि दही वाटी :** दिवसाच्या शेवटी थंड दही आणि ताज्या फळांचे मिश्रण शरीराला थंडावा देते.

**गॅस्पाचो सूप :** टोमॅटो आणि भाज्यांपासून बनवलेले हे थंड सूप उष्णतेत अत्यंत गुणकारी ठरते.

**ग्रीक कोशिंबीर :** काकडी, टोमॅटो व चक्का यांचा वापर केलेली ही कोशिंबीर शरीराला ताजेतवाने ठेवते.

**मसूर सॅलड :** प्रथिने आणि तंतुमय पदार्थांनी युक्त मसूर सॅलड उन्हाळ्यासाठी हलका आहार आहे.


**पनीर टिक्का सॅलड :** भाजलेले पनीर आणि हिरव्या भाज्यांचे मिश्रण प्रथिनांनी भरपूर आणि चविष्ट असते.

**भाज्यांचे रॅप :** ताज्या भाज्या आणि चण्याची चटणी पोळीमध्ये गुंडाळून तयार केलेला हा झटपट आहार आहे.

# ऑफिस संपल्यानंतर ना लोकल, ना बस...! थेट नदीत उडी मारून जातात घरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात ऑफस संपल्यानंतर अनेक लोक बस, कार, मेट्रो किंवा लोकलचा मार्ग निवडतात. पण असे एक ठिकाण आहे जेथे लोक ऑफिस सुटले की थेट नदीत उडी मारून घरी पोहोचतात. भारतात ऑफिसची वेळ संपल्यानंतर रस्त्यांवर आणि मेट्रो-लोकलमध्ये प्रचंड गर्दी पाहायला मिळते. प्रत्येकाला शक्य तितक्या लवकर घरी पोहोचायचे असते. मात्र याच समस्येवर स्वित्झर्लंडमधील लोकांनी एक अनोखा आणि भन्नाट उपा य शोधला आहे. सध्या सोशल मीडियावर याचाच एक व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून तो पाहून अनेकजण आश्चर्यचकित झाले आहेत.व्हायरल व्हिडीओमध्ये काही लोक ऑफिस संपल्यानंतर बस, ट्रेन किंवा ट्रॅफिकमध्ये अडकण्याऐवजी थेट नदीत उडी मारताना दिसत आहेत. हे लोक पोहतच आपल्या घराच्या दिशेने जातात. स्वित्झर्लंडमधील काही शहरांमध्ये हा प्रकार सामान्य असल्याचे सांगितले जात आहे. ऑफिसमधून बाहेर पडताच हे लोक नदीकिनारी



पोहोचतात आणि कोणताही वेळ न दवडता पाण्यात उतरतात. नदीच त्यांच्यासाठी शॉर्टकट रूट बनली आहे.

या संपूर्ण प्रकारातील सर्वात खास गोष्ट म्हणजे लोक आपले कपडे आणि महत्त्वाचे सामान सुरक्षित ठेवण्यासाठी खास वॉटरप्रूफ बॅग किंवा प्लास्टिक पिशव्यांचा वापर करतात. लोक आपले कपडे त्या बॅगमध्ये व्यवस्थित पॅक करून ती सोबत बांधतात किंवा हातात धरून पोहत पुढे जातात. त्यामुळे सामान ओले होत नाही आणि ते आरामात घरी पोहोचू शकतात. हा प्रकार केवळ वेगळाच नाही तर अनेकांच्या मते फायदेशीरही आहे. यामुळे ट्रॅफिकमध्ये अडकण्यापासून सुटका होते आणि बस, ट्रेन किंवा टॅक्सीचे पैसेही वाचतात. याशिवाय पोहण्यामुळे शरीराचा व्यायामही होतो. त्यामुळे हा प्रवास फिटनेससाठीही उपयोगी ठरत असल्याचे अनेकांचे मत आहे.हा प्रकार ऐकायला आणि पाहायला रोमांचक वाटत असला तरी तो काही प्रमाणात धोकादायकही ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी हा उपाय वापरणे शक्य नाही. स्वित्झर्लंडमधील काही शहरांमध्ये नद्या स्वच्छ आणि सुरक्षित आहेत. पाण्याचा प्रवाह नियंत्रित असतो आणि बहुतांश लोकांना पोहता येत असल्याने ते हा पर्याय सहज स्वीकारतात. काही ठिकाणी स्थानिक प्रशासनाकडून सुरक्षेसंदर्भात विशेष मार्गदर्शक सूचनाही दिल्या जातात. काहींनी या कल्पनेचे कौतुक करत तिला स्मार्ट आणि मजेशीर म्हटले आहे, तर काहींनी यामध्ये मोठा धोका असल्याचे सांगत काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे. सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# मना सज्जना...

# जैसा भाव तैसा देव...

परम स्नेही मित्रहो,
समर्थ सद्गुरू स्मरण आणि प्रभू श्रीरामचंद्र हृदयी धारण करून पुढे जाऊया.

श्लोक
**उपेक्षा कदा रामरूपी असेना ।**
**जिवा मानवा निश्चियो तो वसेना ॥**
**शिरी भार वाहेन बोले पुराणी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३३ ॥**

आपण मागेच पाहिले, की समर्थ हळुवार एक-एक गाठ उकलावी तसे मनाला उलगडत भक्तीमार्गाचे स्वरूप समजावून सांगत आहेत. येथे समर्थ मनाला आश्वासित करतात. अनन्यभावाने शरण आलेल्या, 'श्रीराम स्वरूप' झालेल्या भक्ताची उपेक्षा कदापी होत नाही. हे सत्य वचन आहे. तरीही मानवाचे मनातील संशय कमी होत नाही. कारण मनाची धारणा तशीच असते. प्रत्यक्ष देवाच्या वचनाबद्दल देखील संशय घ्यायची त्याची तयारी असते.
**देवा वेगळे कोणी नाही । असे बोलती सर्वही ।**
**परंतु त्यांची निष्ठा काही । तशीच नसेल ॥**
आपण बोलताना देवाशिवाय वेगळे काहीही नाही हे मान्य करतो. पण प्रत्यक्षात तसे वागत नाही. तसा विश्वास ठेवतो का?कारण मनाला तशी सवय नसते. तेव्हा सर्व भार देवाच्या ठायी ठेवणे श्रेयकर नाही का?




याच आशयाचा गीतेच्या नवव्या अध्यायात एक श्लोक आहे त्यात भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात-
**अनन्यानिश्चियन्तो मां ये जना पर्यूपासते ।**
**तेषा नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम ।**

मला शरण आलेल्या भक्तांचा भार वाहण्याचे माझे ब्रीदच आहे. या श्लोकाचे सुंदर वर्णन ज्ञानेश्वर माऊलींनी केले आहे

**तैसा मीवांचूनि कांही L आणीक गोमटेची नाही ।**
**मजचि नाम पाही । जिणेया ठेविले ॥**
**ऐसें अनन्यगतिके चित्ते । चिंतीतसाते मातें ।**
**जे उपासती तयांते । मीचि सेवी ॥**
**ते एकवटुनी जिये क्षणी । अनसुरले गा माझिया वाहणी ।**
**तेव्हांचि तयाची चिंतवणी । मजचि पडली ॥**
पुढे स्पष्ट करतात-
**ऐसा मनी जो धरिती भावो । तो पुढा पुढा लागे तयां देवों ।**
**आणि दिधलीयाचा निर्वाहो । तोही मीचि करी ।**
**हा योगक्षेमु आघवा । तयाचा मजचि पडिला पांडवा ।**
**जयांचिया सर्व भावा । आश्रमो मी ॥**

माझ्या ठायी विलीन झालेल्या भक्ताचा योगक्षेम चालवण्याची चिंता मलाच लागून राहते, असे निसंशय प्रतिपादन ईश्वराचे आहे.
पुढील श्लोकात समर्थ भक्त आणि देवाच्या स्वरूपाचे चिंतन करतात-
**असे हो जया अंतरी भाव जैसा ।**
**वसे हो तया अंतरी देव तैसा ।**
**अनन्यास रक्षित असे चापपाणी ।**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥३४॥**
'भाव तैसा देव' हे लक्षात ठेवले पाहिजे. देव भक्ती करताना ती अनन्य भावाने करायला हवी. आपले अस्तित्व विसरून भक्ती करायला हवी. ती कशी ते पुढील श्लोकात स्पष्ट केले आहे.
च्यारीदेह निरसावे । साधके देहातीत व्हावे ।
देहातीत होतां जाणावे । अनन्य भक्त ॥
अशा रीतीने 'अनन्य' झालेल्या भक्ताची उपेक्षा कशी बरे होईल?
समर्थ म्हणताहेत-
**सदा सर्वदा देव दासाभिमानी ।**
**कृपा भाकिता सिघ्रे पावे निदानी ।**
**तया अंतरी थोर लहान नाही ।**
**परी पाहिजे दृढ भावार्थ काही ॥**

जय जय रघुवीर समर्थ!



# हातात तांब्याचे कडे घातल्यावर काय बदल होतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

- **ग्रहांचे प्रतीक :** ज्योतिषशास्त्रानुसार तांबे हा धातू सूर्य आणि मंगळ ग्रहाशी संबंधित असून तो ऊर्जा आणि शक्तीचे प्रतीक मानला जातो.
- **आत्मविश्वास वाढतो :** तांब्याचा वापर केल्याने व्यक्तीचा आत्मविश्वास, मान-सन्मान आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होते.
- **सूर्याची मजबूती:** हा धातू धारण केल्याने कुंडलीतील सूर्य ग्रह मजबूत होतो, ज्यामुळे समाजात तुमची ओळख आणि प्रतिष्ठा वाढते.
- **मानसिक शांती :** सततचा राग आणि चिडचिड कमी करून मन शांत आणि संयमी ठेवण्यासाठी तांबे अत्यंत गुणकारी ठरते.
- **संरक्षण कवच :** तांब्यामध्ये नकारात्मक ऊर्जा शोषून घेण्याची क्षमता असल्याने, तो वाईट शक्तींपासून तुमचे संरक्षण करतो.
- **तांब्याचे संतुलन :** शरीरात तांब्याचे योग्य संतुलन राखण्यासाठी आणि हाडे मजबूत करण्यासाठी तांब्याचे कडे किंवा अंगठी फायदेशीर ठरते.
- **रक्ताभिसरण :** तांब्याच्या संपर्कामुळे शरीरातील रक्ताभिसरण प्रक्रिया सुधारते आणि शरीराचे तापमान नियंत्रित राहते.

# समिधा जळल्यावर काय बाहेर पडते..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आधी थोडे विज्ञान ,तुम्हाला वायू दिसणार नाहीत. तुम्हाला दिसतो तो धूर सूक्ष्म घनकण. अदृश्य वाफ म्हणून त्या कणांवर बसून येतात. तेच नाकात आणि फुफ्फुसात जातात.

**९ नवग्रह समिधा जळल्यावर काय सोडतात?**

**१) सूर्य : अर्क / रुयी :** चिकाचे वाफ, कॅलोट्रोपिन, -ॲमायरिन जंतुनाशक, नाक मोकळे करते. पूर्वीपासून सायनससाठी.

**२) चंद्र :** पळस - फ्लॅव्होनॉइड्स, ब्युट्रिन, ब्युटीन, फिनॉलिक्स थंडावा देतो, दाह कमी करतो. धूर शांत करणारा.

**३) मंगळ :** खैर - कॅटेचिन, टॅनिन, पॉलिफिनॉल्स जबरदस्त ॲंटिसेप्टिक. काथ यापासूनच करतात . हवेतील जंतू मारतो.

**४) बुध :** आघाडा - सॅपोनिन्स, अल्कलॉइड्स, ओलिअनोलिक ॲसिड बुरशीनाशक, कफ पाडणारा. आयुर्वेदात खोकला/दम्यासाठी वापर.

**५ ) गुरू :** पिंपळ / अश्वत्थ सिनिओल, टॅनिन, -सिटोस्टेरॉल, ऑक्सिजन वाढवतो, दम्यासाठी चांगला. पिंपळ रात्रीही ऑक्सिजन सोडतो; धूर सौम्य शुद्धिकर्ता.

**६) शुक्र :** उंबर रेसिमोसिक ॲसिड, टॅनिन, ग्लुसीऑल थंड, जंतुनाशक. गूलर जखमा भरण्यासाठी वापर.

**७) शनी :** शमी फ्लॅव्होनॉइड्स, पॅट्युलेटिन, ल्युपेऑल दाह कमी करतो, लांब जळतो. वाळवंटी झाड धूर हळू पण सातत्याने शुद्ध करतो.

**८) राहू :** दूर्वा गवत सायनोडिन, ट्रायटरपेनॉइड्स, फिनॉलिक्स थंड, रक्त-शुद्धिकर्ता. गवत लवकर जळते, सूक्ष्म जंतुनाशक वाफ सुटते.

**९ ) केतू :** कुश / दर्भ गवत लिग्नन्स, ट्रायसिन, फ्लॅव्होनॉइड्स रोगजंतूविरोधी, पाणी शुद्ध करण्यासाठी वापर. धूर नैसर्गिक कीटक-नाशक.

सर्व ९ जळल्यावर सामाईक गोष्टी : ६ मुख्य वायू या खास लाकडांमधून सुटतात, जे थेट जंतू कमी करतात. हे नैसर्गिक फ्युमिगेशन आहे . जंतुनाशक वाफ वातावरण भरून निर्जंतुक करते. तेल जळल्यावर फोटोकेमिकल रिॲक्शन्स घडतात आणि औषधी घटक सुटतात.कार्बन थोडा फॉर्मल्डिहाइड मध्ये बदलतो, ज्यामुळे थोडा ऑक्सिजन परत हवेत मिळतो.राख खताचे काम करते.त्यात खनिज तत्त्वं राहतात, जमिनीसाठी चांगली.कार्बन, टर्पीन्स, फिनॉल्स, सिनिओल सर्व अदृश्य. पण तुम्ही धूर पाहता ,त्याचा वास मिरचीच्या वासापेक्षा वेगळा आहे, आणि परिणाम जाणवतो.कमी खोकला, स्वच्छ हवा. यज्ञाचा धूर रोग पसरवणारे जीव मारतो आणि हवा शुद्ध करतो.

# वातींचे प्रकार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) **नंदादीप वात:** किंवा समई वात तेलाच्या दिव्यासाठी- ही ५, ७, ९ पदरी असते. शक्यतोवर ५ किंवा ७ पदरी असते. ही रोज पूजेच्या वेळेस लावतात.
२) **बेल वात :** श्रावणात या महिनाभर लावतात. एकाला जोडून एक अशा ३ वाती करतात (४+४+३ पदरी) एकूण अकरा पदर. या कोणी रोज महिनाभर ११ वाती लावतात. कोणी फक्त सोमवारी लावतात.
३) **शिवरात्र वात :** महाशिवरात्रीला ११०० पदराची वात तुपात भिजवून लावतात.
४) **वैकुंठ वात :** ३५० पदरी आपल्या हाताची वितभर (करंगळी ते अंगठा लांब करून मोजलेले अंतर) करायची ती वैकुठंचतुर्दशीला लावतात. एक पुस्तक वगैरेवर मोजून मग त्यावर गुंडाळतात.
५) **त्रिपूर वात :** तीन पदराच्या जोडून (३६५ +३६५) जोडवाती म्हणतात त्या त्रिपुरारी पौर्णिमेला लावतात.
६) **अधिक महिन्याची वात :** ३३ पदरी ३३ वाती, ३३ फुलवाती तुपात भिजवून लावतात. कोणी महिनाभर लावतात कोणी एकदाच लावतात.
७) **कार्तिकी वात :** एकादशीपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत ३ पदरी १०५ वाती लावतात. कोणी पौर्णिमेलाच १०५ वाती लावतात.
८) **काड वाती:** तुळशीच्या कोरड्या काडीला कापूस गुंडाळून गणपतीला, होमहवन, पुरण आरती करतात.
९) **श्रावण वात :** रोज महिनाभर ११ पदराच्या ११ वाती लावतात.
१०) **फुलवाती:** या निरंजनात रोज लावतो आरतीच्या वेळी.
११) **लक्ष्मी वात:**शीघ्र लक्ष्मीप्राप्तीसाठी कुंकू लावलेली लाल रंगाची फुलवात, या निरंजनात लावतात आरतीच्या वेळी.
१२) **कुबेर लक्ष्मी वात :** शीघ्र लक्ष्मी लक्ष्मीप्राप्तीसाठी कुंकू लावलेल्या लाल फुलवातीसोबत एक लवंग शुद्ध तुपासोबत चांदीच्या निरंजनीत ठेवतात.
१३) **अनंतवात:** यामध्ये एक वशाची एक वात, दोन वशाच्या दोन वाती, तीन वशाच्या तीन, असे १०८ वशाच्या १०८ वाती करतात व तुपात भिजवून श्रीकृष्णाला ओवाळतात.
१४) **देह वात :** आपल्या डोक्यावर टाळूपासून ते पायाच्या अंगठ्या पर्यंतची उंची मोजून घेऊन तेवढ्या लांबीची १०८ किंवा ३६५ पदरी वात करतात व ती तेलात भिजवून ज्याच्या मापाची केलीय त्या व्यक्तीने लावायची असते.
१५) **ब्रम्हांड वात :** आपल्या कपाळावर कुंकू लावतो त्या जागेपासून पूर्ण डोक्याला फेर घेऊन ते मोजून तेवढ्या लांबीची २५० पदरी वात बनवतात व ज्याच्या मापाची आहे त्यांचे हातून तीळ तेलात भिजवून लावतात.
१६) **काकडा:** काळ्या कपड्याचे बारीक तुकडे करून त्याच्या वाती करून काकड आरतीला लावायच्या, दृष्ट काढणे किंवा नजर उतरणे यासाठीही या वाटेचा उपयोग केला जातो.
१७) **दिवटीची वात :** खंडोबाच्या नवरात्रात दिवट्या बुधल्यांसाठी ही वात तयार केली जाते.
१८) **मशाल आणि टेंभे :** जागरण आणि गोंधळ या कार्यक्रमांसाठी मशाल आणि टेंभें यांच्या वाती तयार करतात.
१९) **कंदील वात :** दिवाळीच्या वेळेस दीपमाळ, आकाश दिवे, काचेचे कंदील, शेगडी इत्यादींसाठी सुती धाग्यांच्या वीणीच्या जाड चपट्या सुतासारख्या वाती.
२०) **दारूगोळा वात :** फटाके आणि तोफांच्या दारूगोळ्याच्या कामी येणारी ही वेगळ्या प्रकारची वात असते.
२१) **रथ सप्तमी :** ७ पदरी.
२२) **कृष्णाला :** ८ पदरी.
२३) **राम नवमीला :** ९ पदरी.
२४) **दशावतारीवात :** विष्णूला १० पदरी.
२५) **शंकराला :** ११ पदरी.
२६) **सूर्याला:** १२ पदरी.
२७) **वैकुंठ चतुर्दशीला :** १४ पदरी.
२८) **गणपतीला :** २१ पदरी.

हे सगळे वर्षभर करायचे असेल, तर नेम म्हणून तर त्या-त्या दिवसापासून परत त्या दिवसापर्यंत व्रत करतात करणारे, जसे- रथसप्तमी ते रथसप्तमी, गोकुळाष्टमी ते गोकुळाष्टमी.

वरील सगळ्या वाती वसा काढूनच करतात आणि जितकी पदरी पाहिजे तितके पदर गुंडाळायचे. फक्त जोडवाती म्हणजे एकाला एक दोन वाती जोडायच्या म्हणजे एक पूर्ण झाली की न तोडता दुसरी करायची.

३ पदरी असते ही वात ३+३ पदर..
बेलवाती पण एकाला एक जोडून ३ वाती, ४,४,३ पदरी.

# तीळ द्वादशी व्रताने सर्व व्याधी दूर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हे व्रत षट्तिला एकादशीप्रमाणेच आहे. यासाठी माघ. शु. द्वादशीला तीळमिश्रित पाण्याने स्नान करावे. तिळांनी विष्णूपूजन करावे. तिळाच्या तेलाचा दिवा लावावा. तिळाचाच नैवेद्य दाखवावा. तिळाचेच हवन करावे आणि भोजनात तिळाचेच प्रमाण अधिक असावे. यामुळे स्वाभाविक, आगन्तुक, शारीरिक आणि सांसर्गिक सर्व व्याधी दूर होतात व सर्व प्रकारचे सुख लाभते.




### भीमद्वादशी व्रत

हे व्रत माघ शु. द्वादशीलाच असते. या व्रताला ब्रह्मार्पण करून ब्राह्मणांना भोजन द्यावे आणि पारणे करावे. एकादशीप्रमाणेच बाकीचा विधी आहे. हे व्रत वासुदेवाने प्रथम भीमाला सांगितले म्हणून त्याला भीमाचे नाव प्राप्त झाले. शु. दशमीला शरीराला तूप लावून स्नान करावे.
**'ॐ नमो नारायणाय'**
या मंत्राने भगवान विष्णूंची पूजा. त्याबरोबर गरुड-श्री गणेश यांची पूजा. एकादशीला पूर्ण उपवास. द्वादशीला नदीमध्ये स्नान करून घरापुढे मांडव घालावा. एका तोरणाला पाण्याने भरलेले पात्र टांगावे. त्या पात्राच्या तळाला एक छिद्र पाडावे. त्यातून झिरपणारे थेंब मस्तकावर घ्यावे. नंतर ऋग्वेदी पुरोहिताकडून होम, यजुर्वेदी पुरोहिताकडून रुद्रावर्तन आणि सामवेदी पुरोहिताकडून सामगायन करवावे. पुरोहितांना वस्त्रालंकार देऊन त्यांचा सन्मान करावा. हे व्रत करणारा पापमुक्त होतो. या व्रताचे महात्म्य वाजपेय आणि अतिरात्र या यागापेक्षाही मोठे आहे, असे सांगितले आहे.
**फल- विष्णुलोकप्राप्ती.**

### वराह द्वादशी

एक तिथीव्रत. माघ शु. द्वादशीला हे व्रत करावयाचे असते. भगवान विष्णूंचा अवतार वराह ही या व्रताची देवता आहे.
**या व्रताचा विधी :** एकादशीला व्रतसंकल्प व पूजा करावी. एका पात्रात सुवर्णाची, चांदीची किंवा तांब्याची नाणी व सर्व प्रकारची धान्यबीजे घालून त्यावर वराहाची सोन्याची मूर्ती ठेवावी आणि तिची पूजा करावी. रात्री जागर करावा. द्वादशीला पूजेतील वराहाची मुरी ब्राह्मणाला द्यावी.
**फल- सौभाग्य, संपत्ती, सौंदर्य, अपत्य यांची प्राप्ती.**

# ३३ कोटि देवी-देवताओं की सूची

३३ कोटि (प्रकार) देवी-देवताओं की सूची में

- **८ वसु (प्रकृति के संरक्षक) :** आप, ध्रुव, सोम, धर, अनिल, अनल, प्रत्यूष और प्रभास (ये पृथ्वी, अग्नि, वायु, जल, अंतरिक्ष आदि के प्रतीक हैं)।
- **११ रुद्र (शिव के रूप) :** मनु, मन्यु, शिव, महत, ऋतुध्वज, महिनस, उम्रतेरस, काल, वामदेव, भव, और धृत-ध्वज (विनाश और पुनरुत्थान के देवता)।
- **१२ आदित्य (सूर्य के रूप) :** अंशुमान, अर्यमन, इंद्र, त्वष्टा, धातु, पर्जन्य, पूषा, भग, मित्र, वरुण, वैवस्वत और विष्णु (सौरमंडल की १२ शक्तियाँ)।
- **२ अश्विनी कुमार (देवताओं के वैद्य) :** स्वास्थ्य और औषधियों के देवता (नासत्य और दस्र)।

# २४ एकादशीपैंकी सर्वांत मोठी कोणती? यावर्षी त्याचे व्रत कधी पाळले जाईल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकादशीचे व्रत आणि त्यासोबत भगवान विष्णूंची पूजा केल्याने जीवनात आनंद मिळतो. त्यातच वर्षातून एकूण २४ एकादशी व्रत येतात. तर अनेकदा असा प्रश्न पडतो, की या एकादशी व्रतांपैकी सर्वांत मोठी एकादशी कोणती?

आपल्या सनातन धर्मात एकादशीची तिथी खूप खास मानली जाते. ही तिथी जगाचे पालनपोषण करणाऱ्या भगवान विष्णूंना समर्पित असल्याने अनेक भाविक-भक्त प्रत्येक महिन्याला येणाऱ्या एकादशीची मनोभावे पूजा करतात. तर एकादशीला भगवान विष्णूंची विशेष पूजा आणि उपवास केला जातो. वर्षभरात २४ एकादशी व्रत असतात. पहिली एकादशी महिन्याच्या कृष्ण पक्षात आणि दुसरी शुक्ल पक्षात येते. मान्यतेनुसार एकादशी हे भगवान विष्णूंचा आशीर्वाद मिळविण्याचा एक विशेष प्रसंग आहे. या दिवशी पूजा आणि उपवास केल्याने व्यक्ती सर्व पापांपासून मुक्त होतो.


एकादशीचा उपवास आणि भगवान विष्णूंची पूजा केल्याने जीवनात आनंद आणि समृद्धी येते. संकटे दूर होतात. शिवाय मृत्यूनंतर एकादशीचे व्रत केल्याने मोक्ष मिळतो आणि भगवान विष्णूंच्या वैकुंठस्थानी स्थान मिळते. तथापि अनेक लोकांना प्रश्न पडतो, की २४ एकादशी व्रतांपैकी कोणती एकादशी व्रत सर्वांत महत्त्वाची आहे?

### निर्जला एकादशी

धार्मिक शास्त्रांनुसार ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षात येणारी एकादशी सर्वांत महत्त्वाची मानली जाते. या एकादशीला निर्जला एकादशी म्हणतात. या एकादशीला व्रत करणारी व्यक्ती पाणी देखील पित नाही, म्हणूनच याला निर्जला एकादशी म्हणतात. असे मानले जाते, की निर्जला एकादशीचे व्रत केल्याने वर्षभरातील सर्व एकादशीच्या व्रतांचे फळ मिळते. या वर्षी निर्जला एकादशी २५ जून रोजी साजरी केली जाईल.

### देवउठनी एकादशी

देवउठनी एकादशीला देवोत्थान किंवा प्रबोधिनी एकादशी असेही म्हणतात. ही एकादशी कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षात उज्ज्वल पंधरवड्यात येते. हा दिवस भगवान विष्णू त्यांच्या चार महिन्यांच्या योगिक निद्रांमधून जागे होतात. म्हणजेच या एकादशीच्या दिवशी चातुर्मास संपतो. त्यानंतरच शुभ आणि मांगलिक कार्ये पुन्हा सुरू करता येतात. म्हणूनच ही एक महत्त्वाची एकादशी मानली जाते. या वर्षी २१ नोव्हेंबर रोजी व्रत आहे.



(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)